सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website**: www.jdroamt.org
**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/परिपत्रक/२०२६/ 1269
दिनांक :- 19 MAY 2026

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- दिनांक ५ जून जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने निसर्ग प्रदर्शन-The Nature and Sustainability Exhibition बाबत.**

**संदर्भ :-** मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे दिनांक १४/०५/२०२६ रोजीचा ई-मेल

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने ई-मेलव्दारे प्राप्त झालेले मा. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्या ०६.०५.२०२६ रोजीच्या पत्राची प्रत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांनी दिलेल्या निर्देशानुसार, पर्यावरण संवर्धनासाठी महाराष्ट्र शासनाच्या पुढाकारातून **"वसुंधरा रक्षक अभियान"** अंतर्गत उपक्रम आयोजित करण्यात येत आहे. या उपक्रमांमध्ये १०,००० विद्यार्थ्यांच्या सहभागातून हरित संकल्प शपथ घेऊन पर्यावरण संरक्षणाचा जागतिक संदेश दिला जाणार आहे. हा उपक्रम दिनांक ५ जून जागतिक पर्यावरण दिन रोजी सकाळी ७.०० ते ११.०० या वेळेत आयोजित करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रम महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री व मा. पर्यावरण मंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे महाराष्ट्राला जागतिक पातळीवर पर्यावरण संवर्धनातील अग्रणी राज्य म्हणून उभे करणे हा आहे.

या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, **"हरित संकल्प शपथ"** घेवून दिनांक ५ जून जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात यावा. तसेच सदर कार्यक्रमामध्ये आपल्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदविण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**सहपत्र :-** वरिल प्रमाणे.

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४१४,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२

दूरध्वनी क्र. ०२२ - २२८२०३०४ Email ID : mashi६-hted@mah.gov.in

क्र. संकीर्ण-२०२६/ ई.क्र. १६५६१६०/ मशि-६ दिनांक: १४ मे, २०२६

प्रति,
१) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय:- दिनांक ५ जून जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने निसर्ग प्रदर्शन - The Nature and Sustainability Exhibition बाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने प्राप्त झालेले सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्या दि.०६.०५.२०२६ रोजीच्या पत्राची प्रत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

२. मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांनी दिलेल्या निर्देशानुसार, पर्यावरण संवर्धनासाठी महाराष्ट्र शासनाच्या पुढाकारातून "वसुंधरा रक्षक अभियान" अंतर्गत उपक्रम आयोजित करण्यात येत आहे. या उपक्रमामध्ये १०,००० विद्यार्थ्यांच्या सहभागातून "हरित संकल्प शपथ" घेऊन पर्यावरण संरक्षणाचा जागतिक संदेश दिला जाणार आहे. हा उपक्रम दिनांक ५ जून (जागतिक पर्यावरण दिन) रोजी सकाळी ७.०० ते ११.०० या वेळेत आयोजित करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रम महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री व मा. पर्यावरण मंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे महाराष्ट्राला जागतिक पातळीवर पर्यावरण संवर्धनातील अग्रणी राज्य म्हणून उभे करणे हा आहे. सदर कार्यक्रमासाठी मुंबई महानगर प्रदेश (MMR) क्षेत्रातून प्रत्येक शाळा/विद्यालयाकडून किमान ५० विद्यार्थ्यांचा सहभाग अनिवार्य असून, सहभागी झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. या अनुषंगाने उपरोक्त कार्यक्रमासाठी या

विभागाच्या अधिनस्त महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेण्याची विनंती उपरोक्त दि.०६.०५.२०२६ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आलेली आहे.

३. तरी, सदरहू पत्राच्या अनुषंगाने आपला वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास उलटटपाली सादर करावा, ही विनंती.

आपला,

THORAT AJITKUMAR ARUNRAO
Date: 2026.05.14 14:36:04 +05'30'

**(अजितकुमार थोरात)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

सहपत्र : वरीलप्रमाणे

मंत्रालयीन सेवा

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र शासन
## पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दुरध्वनी क्रमांक : (०२२) २२०२९३८८ Email : tc1-env@mah.gov.in


क्रमांक :- ईनव्ही-२०२६/प्र.क्र.१६१/तां.क. १ दिनांक : ०६.०५.२०२६

प्रति,
१) अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) आयुक्त, शिक्षण (महाराष्ट्र राज्य), पुणे.
४) संचालक, उच्च शिक्षण, मुंबई.
५) संचालक, एन.एस.एस. सेल, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
६) राज्य समन्वयक अधिकारी,
एन.एस.एस. सेल, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय** :- दिनांक ०५ जून जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने निसर्ग प्रदर्शन -The Nature and Sustainability Exhibition चे आयोजन करणेबाबत.

**महोदय / महोदया,**

आपल्याला कळविण्यात आनंद होत आहे की, मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांनी दिलेल्या निर्देशानुसार पर्यावरण संवर्धनासाठी महाराष्ट्र शासनाच्या पुढाकारातून 'वसुंधरा रक्षक अभियान' अंतर्गत एक भव्य उपक्रम आयोजित करण्यात येत आहे. या उपक्रमामध्ये १०,००० विद्यार्थ्यांच्या सहभागातून 'हरित संकल्प शपथ' घेऊन पर्यावरण संरक्षणाचा जागतिक संदेश दिला जाणार आहे. हा उपक्रम दिनांक ५ जून (जागतिक पर्यावरण दिन) रोजी सकाळी ७.०० ते ११.०० या वेळेत आयोजित करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रम महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री व मा. पर्यावरण मंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

०२. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे 'Guinness World Record' प्रस्थापित करून महाराष्ट्राला जागतिक पातळीवर पर्यावरण संवर्धनातील अग्रणी राज्य म्हणून उभे करणे हा आहे. सदर कार्यक्रमासाठी **मुंबई महानगर प्रदेश (MMR) क्षेत्रातून** प्रत्येक शाळेकडून किमान ५० विद्यार्थ्यांचा सहभाग अनिवार्य असून, सहभागी झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

०३. कार्यक्रम स्थळी उपस्थित विद्यार्थ्यांसाठी मोफत नाश्ता व पेय व्यवस्था शासनाकडून करण्यात येणार आहे.

०४. सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने समन्वय साधण्यासाठी श्री. संजय भुस्कुटे (मो.क्र. ९९२००४३००४), जनसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांना संपर्क करावा.